दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

मुख्य संपादक : अजय भांगे

बीड/महाराष्ट्र • रविवार दि.१५ डिसेंबर २०२४ • आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ • वर्ष २ रे • अंक-१०७ • पाने ४ • किंमत ४ रुपये

## आज नागपुरात मंत्रिमंडळाचा शपथविधी

**नागपूर (वृत्तसंस्था)**–राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाला काही तास शिल्लक असतानाही मंत्रिमंडळ विस्तारातील नावे उघड न झाल्याने तिन्ही पक्षाच्या इच्छुकांची धाकधुक वाढली आहे. दरम्यान, हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला म्हणजे रविवारी, उपराजधानीतील राजभवनात शपथविधी सोहळ्याची तयारी सुरू झाली. एक हजार पाहुण्यांची आसन व्यवस्था केली जात आहे. राजभवनातील हिरवळीवर शपथविधी होणार आहे.१५ डिसेंबरला दुपारी ४ वाजता नागपूरमध्ये राजभवनावर हा सोहोळा होत आहे. राज्याच्या राजकीय ईतिहासात नागपूरमध्ये मंत्रिमंडळाचा शपथविधी होण्याची ही दुसरी वेळ आहे. यापूर्वी २२ डिसेंबर १९९१ रोजी छगन भुजबळ यांच्यासह डॉ. राजेंद्र गोडे, जयदत्त क्षीरसागर, वसुधा देशमुख, भरत बाहेकर यांनी मंत्री म्हणून शपथ घेतली होती.शपथविधीसाठी उपराजधानीच्या राजभवन परिसरात भव्य व्यासपीठ व डोमसारखा शामियाना उभारण्याचे काम युद्ध पातळीवर सुरू झाले आहे.

# कायदा अन सुव्यवस्थेचे बीड जिल्हाचे धिंडवडे !

## रक्ताच्या राजकारणात लाल दिव्याचा प्रकाश,पोलीसांच्या कर्तव्यात कसूर

## गुंड प्रवृत्तीच्या लोकांना रोखणे सामाजिक जबाबदारी

**केज । प्रतिनिधी**

हत्या ही कुठल्या जातीने जातीची केलेली नसते, हत्या वृतिने केलेली नीच कृती असते. हिंसेला धर्म वा जातीच्या रंगात पाहिले जाऊ शकत नाही, सांडणारे रक्त हे लालच असते. मात्र दुर्दैवाने प्रत्येक घटनेत जातीने भूमिका घेणे अनेकांना सोयीस्कर वाटू लागले आहे हे वास्तव आणि अपरिहार्य दिसत आहे.

एक वेळ घेऊन व्यक्त होणारे नेते स्वतचे वैर काढत असतील तर त्या मृत्यूची अवेहेलना आहे, काल पर्यन्त मात्र सर्व बोलून झाले आहेत, काय वाटते हे सगळे सरळ असते का? संतोष देशमुख यांचा मृत्यू जेवढा संताप जनक आहे तितकेच या प्रकरणात होत असलेले राजकारण आणि जातीवाद देखील किळसवाणे असावे सरपंच यांच्या शरीराचा फोटो पाहिला तर काळीज पिळवटून जाते मूठ आवळून जाते आणि नराधम धरून त्याच वाटेने पाठवावा अशी भावना सर्वांची आहे. पैसे माणसाला परत आणून देत नाहीत,गेलेली माणसे परत येत नाहीत, त्यामुळे आरोपीना शिक्षा आणि या पुढे असे नको व्हायला या साठी प्रयत्न केले पाहिजेत. सरपंच यांची हत्या पवन चक्की पासून मिळणाऱ्या अघोरी मिळकती साठी ज्या नराधम लोकांनी केली त्यांना शिक्षा मिळावी यातून जरब निर्माण व्हावी. राजकारण कुणी करणार असेल तर ते दुर्देवी आहे,यासाठी एका युवकाच्या हत्येचे भांडवल केल का ? जर केली असेल तर हत्येचे राजकारण अत्यंत किळसवाणे आहे ,मस्साजोगच्या सरपंच संतोष देशमुख या युवा सरपंचाचा खून झाला तो खून केवळ संतोष यांच्या शरीराचा नाही तर तो मानवतेचा आहे, बीड पोलिसांच्या जरबेचा देखील तो खून आहे, तो खूनआहे. समाजातल्या सलोख्याचा संतोष देशमुख गेला तो आता कधीच परत येणार नाही, ज्यांनी केला त्या नराधम मानसिकतेला ठेचून काढण्यासाठी आमदार कसली मागणी कुणाकडे करत आहेत. ? कर्तव्यात कसूर कोणाच्या सांगण्यावरून पोलीसांनी केला? गुंड प्रवृत्तीच्या लोकांना रोखणे सामाजिक जबाबदारी नाही का? मुळात हत्या राहिली बाजूला वाल्मिकी रामायण ऐकणाऱ्या बीडला आता याच नावाचे महाभारत समजून घ्यावे लागेल. कायदा हा सर्वांसाठी समान आहे. कायद्याची अंमलबजावणी करण्याच काम प्रशासनाच असत. प्रशासन,चोख,स्वच्छ, कठोर,निर्भय असेल तर नक्कीच व्यवस्थेला प्रत्येक नियमाची अंमलबजावणी करावीच लागते. प्रशासन कुचकामी,भ्रष्ट असेल तर मग सगळ काही आपल्या सोयीनुसार होत राहत असत. कायदा चांगलाच असतो पण त्याचा वापर कोण कस करतय यावर सगळ काही अवलंबून असत. पोलीस प्रशासनाची भूमिका महत्वाची असते. पोलिसांनी जर निर्भयपणे काम केल तर गुन्हेगारांच्या चड्ड्या पिवळ्या झाल्याशिवाय राहत नाहीत. पोलीसच जर बोटचेपी भूमिका घेत असतील,कुठे ना कुठे मॅनेज होत असतील,पैसा खात असतील तर गुन्हेगार डोके वर का? काढणार नाहीत. राज्यात आणि केंद्रामध्ये सतत या ना त्या पक्षाच सरकार येत असत. निवडणुकीच्या कार्यकाळात



वेगवेगळे वादे, आश्वासने दिली जात असतात. सर्वात महत्वाच आश्वासन हे असत की, गुंडगिरी मोडित काढू, व्यवस्था सुरळति करू अस असत. पण या गोष्टी फक्त बोलण्यापुरत्याच राहिलेल्या आहेत. प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी होत नाही. अनेकवेळा गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तीसोबत पुढाऱ्यांचे लागेबांधे असतात. काहीचे व्यवसाय देखील असतात. व्यवसायातून,पैशातून, राजकारणातून व इतर कारणातून गुंडगिरी प्रवृत्ती वाढत आहे. खून करण, मारामा–या करण ही बाब आता क्षुल्लक वाटू लागली. राजकारण तत्वाच आणि विचाराच राहिल नाही. त्यामुळे गुन्हेगारीही वाढू लागली. पूर्वीच्या आणि आजच्या राजकारणामध्ये खूप फरक आहे. एखादा आरे म्हणला की, त्याला कारे म्हटले जाते. दरवर्षी गुन्हेगारीचा आलेख कमी होण्याऐवजी वाढू लागला. त्यात खून, बलात्कार, विनयभंग, चोऱ्या,मारामाऱ्या,लुटालुट इत्यादी गुन्ह्यांचा समावेश आहे. बीड जिल्ह्यात नेहमीच कुठल्या ना कुठल्या गंभीर घटना घडतात. त्याचे पडसाद राज्यामध्ये उमटत असतात. सहा दिवसांपूर्वी पवनचक्की यावरून मस्साजोग येथील सरपंचाचा खून करण्यात आला. या घटनेने राज्यात खळबळ उडाली आहे. या प्रकरणातील आरोपीविरोधात कारवाई करण्यात आली. आरोपीच्या अटकेसाठी लोक रस्त्यावर उतरले होते. ही घटना अत्यंत गंभीर आहे. विरोध केला म्हणून एखाद्याला संपवण म्हणजेच हे राज्य कायद्याच आहे की, गुन्हेगारांच असाच प्रश्न पडू लागला. अशा घटना यापूर्वी अनेकवेळा घडलेल्या आहेत. काही घटना दोन गटात तर काही घटना अंतर्गत घडलेल्या आहेत. पण घटना कुठलीही असो काहीही असो जो धाक पाहिजे तो धाक आता दिसेना झाला. एखाद्याला वाटाव की, आपण गुन्हा करीत आहोत पण त्याचा परिणाम वाईट होतील. असा विचार गुन्हेगाराच्या मनात यावा तशी व्यवस्था निर्माण व्हावी. कधी कधी पुढारीच गुंडांना पाळण्याच काम करतात. ते गुंड त्यांना निवडणुकीमध्ये कामी येतात. इतर अनेक प्रकरणामध्ये सुद्धा कामी येतात. तडीपार प्रकरणातील काही गुंडांना अभय देण्याचे काम करत असतात. म्हणजेच राजकारण हे गुंडगिरी वृत्तीच झालय असच आता म्हणायला हरकत नाही. राज्याचे आणि केंद्रीय गृहमंत्र्यांनी याबाबतच आत्मचिंतन केल पाहिजे. गुंडांच राज्य हे आगामी काळात परवडणार नाही. कारण आज जी गुंडगिरीची भाषा आणि गुंडांचा इतरांसाठी जो उपयोग केला जातो तो कधी काळी आपल्यासाठीही होऊ शकतो असा विचार राजकीय क्षेत्रातील पुढारी का? करत नाहीत. त्यामुळे कायदा, सुव्यवस्था अबाधित राखली पाहिजे. त्याच्यांत कसल्याही प्रकारची तडजोड होता कामा नये. हे राज्य कायद्याच अस वाटल पाहिजे. एखाद्यावर अन्याय झाला तर तो टाहो फोडत असतो. कधी कधी अन्यायग्रस्तांना न्याय मिळत नाही. ज्यावेळी त्याला न्याय मिळत नाही त्यावेळी तो हतबल असतो. आणि या नैराश्यातून टोकाच पाऊल उचलण्यापर्यंत त्याची पावले पडत असतात. कधी कधी काही लोकनैराश्यातून आत्महत्या करतात. अशा घटना घडू नयेत आणि प्रत्येकाला न्याय मिळावा आणि गुंडगिरीच समुळ नायनाट व्हावा अस राज्य निर्माण करण्याची जबाबदारी ही शासन, प्रशासनाची आहे.

### ६ दिवसा पासुन मस्साजोग मधील सगळे व्यवहार बंद

**मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची झालेली हत्या क्लेशदायीच आहे, त्याचा सर्वांनी निषेधच केला आहे. यातील आरोपींना कठोर शासन लवकरच होण्यासाठी मस्साजोग येथील सर्व जाती धर्माच्या लोकांनी ६ दिवसा पासुन व्यवसाय बंद ठेवले आहेत,युवा सरपंच संतोष देशमुख यांची निघृण हत्या अत्यंत क्लेशदाई आहे. गुन्हेगाराला जात धर्म नसतो.**


## मस्साजोग घटना अमानविय असून आरोपींना फाशी द्यावी

### पप्पु कागदेंचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन

**बीड । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची हत्या अमानविय असून घटनेतील सर्व दोषींना कठोर शिक्षा व्हावी. तसेच परभणी येथे माथेफीरुने संविधानाची विटंबना केली आहे. त्याच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा. परभणी पोलिस आंबेडकरी वस्त्यांमध्ये कोबिंग ऑपरेशन करुन तरुणांवर गुन्हे दाखल करत आहेत. हा प्रकार तातडीने थांबविण्यात यावा.आशा मागणीचे निवेदन युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पु कागदे यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना त्यांच्या सागर निवासस्थान, मुंबई येथे शनिवार (ता.१४) रोजी दिले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, केज तालुक्यातील मस्साजोग येथील माजी सरपंच



संतोष देशमुख यांचे अपहरण करुन त्यांची अमानविय हत्या घडवून आणली आहे.परिणामी जिल्ह्यासह राज्याचे वातावरण ढवळून निघाले आहे.त्यामुळे संतोष देशमुख यांच्या हत्येतील सर्व दोषींना कठोर शिक्षा होण्यासाठी तपास पारदर्शकपणे केला जावा.त्याचबरोबर या प्रकरणात दिरंगाई करणाऱ्या पोलिसांवर देखील कडक कारवाई करण्यात यावी. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलेल्या निवेदनात पप्पु कागदे यांनी असंही म्हंटले आहे की, परभणी जिल्ह्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा परिसरात असलेल्या संविधान प्रतिची एका माथेफीरुन विटंबना केली आहे.त्याच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा.कारण संविधान देशाच्या सर्वोच्चस्थानी आहे, जर कोणत्याही व्यक्तीकडून संविधानाचा अवमान होत असेल तर त्याची गय केली जाऊ नये.अशी मागणी केली असून पोलिसांकडून आंबेडकरी वस्त्यांमध्ये सुरू असलेले कोंबिंग ऑपरेशन आणि नाहक दाखल झालेले गुन्हे मागे घेण्यात यावेत. अशी मागणी मुख्यमंत्री यांना दिलेल्या निवेदनात पप्पू कागदे यांनी केली.

## एस पी बारगळ साहेब मटका बुक्की वाल्याचं आणि पोलीसांचे लागेबंद आहेत का?


### कुठे गेले एएसपी कमलेश मिना, पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन, मटक्या वाल्यांना आदंन दिल काय? पोलीसांची डोळे झाक?

**नेकनूर । शेख शाकेर**

तालुक्यात घरे, संसार उद्धस्त करणारा मटका नावाचा जुगार बेमालूम पद्धतीत चालू आहे हे तुमच्या पोलीस प्रशासनास उघड्या डोळ्याने दिसतोय तरीपण पोलीस कानाडोळा करत आहेत. रोज बातम्या करून मटक्याच्या बुक्कीतील चिठ्ठी टाकून ही कुठलीच कारवाई केली जात नाही मग खरच यांना तुमच्या पोलीस प्रशासनाचे अभय आहे का?

रोज बरबाद होणारे संसार व दुसरी कडे लाखो रूपयात खेळणारे बुक्की मालक ऐवढा विरोधी अभास फक्त आणि फक्त तुमच्या प्रशासनातील लोकान मुळे होताना दिसत आहे. कुठे पै पै कमवून श्रीमंत होण्याच्या नादात रूप रूपया कमावणारी

सर्व सामान्य माणूस व ऐकीकडे लाखो रूपय दिवसाला कमावणारा बुक्की मालक. मग




प्रशासन या हैवान अवैध धंदे करणाऱ्यां मालका सोबत आहे का? का दिवस भरातील श्रीमंतीच वेड लागणाऱ्या रूप रूपया गोळा करणाऱ्या सर्व सामान्य लोकांचे आहे हे कळायला मार्ग नाही. कर्ता धरता पुरूष दिवसभराची कमाई या मटक्या पाई खर्चुन घरी जातो त्या बायकोची वेदना तुमच्या पर्यंत पोहचणार नाही पण या अवैध धंद्यातुन मिळणारी महिन्याची ठरावीक रक्कम तुमच्या अधिकाऱ्यां पर्यंत पोहचली जाते. याच गोरख धंद्या मुळे नेकनूर तालुक्यात मटका बुक्की वर कारवाई केली जात नाही. हे तुमच्या नेतृत्व खालील प्रशासन ची हार आहे. कधी नव्हे तो तुमच्या मुळे कर्तव्यदक्ष एस पी आम्हाला मिळाले आहेत. तुमच्या एलसीबी नेकनूर च्या जुगारा वर धाड टाकून आरोपी पकडतात व गुन्हे दाखल करतात पण नेकनूर तालुक्यातील पोलीस उपधिक्षक, पोलीस निरीक्षक हे करू शकत नाहीत हे दुर्दैव फक्त नेकनूरकरांच्या नशीबात आहे. असे आता जनतेतून आवाज येत आहे.

## जिल्ह्यात २७ डिसेंबरच्या मध्यरात्रीपर्यंत मनाई आदेश लागू

**बीड । प्रतिनिधी**

मराठा, ओबीसी,धनगर समाजाचे आरक्षण मागणी अनुषगांने आंदोलने चालू आहेत दि. १६ डिसेंबर २०२४ पासून हिवाळी अधिवेशन सुरु होत आहे.तसेच आगामी कालावधीत दत्त जयंती उत्सव साजरा होणार आहे. महाराष्ट राज्याचे हिवाळी अधिवेशनाच्या अनुषंगाने विविध राजकीय पक्ष संघटनेच्या वतीने त्यांच्या न्याय मागण्यासाठी विविध प्रकारचे निदर्शने आंदोलने होण्याची शक्यता असून अचानक घडणारे घटनावरुन व किरकोळ कारणावरुन तणाव निर्माण होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच आरक्षणच्या मागणीसाठी सर्व समाज व राजकीय पक्ष अक्रमक आहे या करिता कायदा व सुव्यवस्था अबाधित राहवी यासाठी मनाई आदेश जारी करण्यात आले असल्याचे अपर जिल्हादंडाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी प्रसिध्दी पत्रकात नमूद केले आहे.

दिनांक १३ डिसेंबर २०२४ रोजीचे ००.०१ वाजेपासून ते २७ डिसेंबर २०२४ रोजीचे २४.०० वाजेपर्यंत बीड जिल्हयात या कालावधीत महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये काढण्यात येणा–या प्रतिबंधात्मक आदेशामध्ये मोर्चे, निदर्शने, आंदोलने, धरणे आंदोलने यासारख्या आंदोलनामध्ये पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येण्यास निर्बंध राहील. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधीत राहावी या करीता कलम ३७ (१) (३ ) अन्वये मनाई आदेश जारी केला आहे.शासकीय कर्तव्य पार पाडणा–या कर्मचा–यां व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस सार्वजनिक ठिकाणी किंवा त्यांच्या जवळपास खालील बाबीस मनाई करण्यात आली आहे. या अन्वये शस्त्र, सोटे ,काठी, तलवार, बंदूक, लाठया, काठया, कोणतेही दाहक पदार्थ, किंवा स्फोटके, दगड, किंवा इतर क्षेपाणस्त्रे, शरीरास इजा होणा–या वस्तू बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. आवेशी भाषणे, अंगविक्षेप, विडांबनात्मक नकल, सभ्यता, नितिमत्ता यास बाधा येईल किंवा ज्यामुळे राज्याची सुरक्षिता धोक्यात येईल, किंवा अराजकता माजेल अशी चित्रे, निशाणी, घोषणा फलक किंवा इतर कोणतीही वस्तू जवळ बाळगू नये. जाहिरपणे घोषणा करणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे किंवा कोणतीही कृती जे देशाच्या संविधानातील मुल्यांच्या विरुध्द असेल किंवा देशाचा मान व सार्वभौमत्व यांना इजा पोहचणार असेल किंवा सार्वजनिक सुरक्षा आणि सामाजिक सलोखा यांना हानी पोहचणारी असेल, व्यक्तीच्या किंवा शवांच्या किंवा प्रेते किंवा आकृती,किंवा त्यांच्या प्रतिमा यांचे प्रदर्शन यासाठी मनाई आहे. पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येता येणार नाही, मिरवणूका मोर्चे काढता येणार नाही.कोणताही मोर्चा, सभा, मिरवणूक व तत्सम कोणतीही कृती करण्यासाठी त्या क्षेत्रातील सक्षम पोलीस अधिका–यांची पूर्वमान्यता घेणे आवश्यक राहील. तसेच विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूकीस लागु राहणार नाहीत व अशी कोणतीही मनाई राज्य शासनाच्या मंजूरीशिवाय १५ दिवसापेक्षा जास्त मुदतीपर्यंत अमलात राहणार नाही.

## लिंबागणेश जि.प.गटात विकासकामाचे उद्घाटन

### बेलखंडी फाटा–नागझरी ते नामाजीबुवा रस्त्याचा शुभारंभ

**बीड । प्रतिनिधी**

लिंबागणेश जिल्हा परिषद गटातील डोंगरभागातील गावांचे दळवळण सोयीस्कर व्हावे यासाठी आ.संदीप क्षीरसागर यांच्याकडून मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत बेलखंडी फाटा–नागझरी ते नामाजी बुवा मंदीरापर्यंतच्या एकूण साडेसहा किलोमीटर डांबरी, एकूण साडेतीन कोटी रुपयांच्या रस्ता कामाचे उद्घाटन करण्यात आले. दरम्यान निवडणुकीत विजयी झाल्यानंतर आ.क्षीरसागर पहिल्यांदा या भागात आल्यामुळे नागरिकांनी मोठ्या जल्लोषात त्यांचे स्वागत केले.

लिंबागणेश जिल्हा परिषद गटातील डोंगरभागात असणाऱ्या गावांचे दळवळण सोयीस्कर व्हावे. येथील लोकांना सोयीसुविधेच्या उपलब्धतेसाठी वाहतूक व्यवस्था सक्षम असावी यासाठी आ.संदीप क्षीरसागर यांच्या पाठपुराव्यातून ईजिमा ११५ ते नागझरी फाटा ते



नामाजीबुवा मंदीरापर्यंत ०/०० ते ६/३०० च्या एकूण साडेसहा किलोमीटर अंतर असलेल्या डांबरी रस्त्याच्या कामाला मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत मंजुरी मिळाली. शनिवार (दि.१४) रोजी या रस्त्याच्या कामाचा शुभारंभ आ.संदीप क्षीरसागर यांनी केला. या कामाला लवकरच प्रत्यक्ष सुरूवात करण्यात येणार आहे. या विकासकाम शुभारंभ प्रसंगी माजी आ.सय्यद सलीम, राजेंद्र मस्के, परमेश्वर सातपुते, गणेश वरेकर, वैजनाथ नाना तांदळे, गोरख शिंगण, बाळासाहेब गोरे यांच्यासह जिल्हा परिषदेच्या संबंधित विभागाचे अधिकारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संपादकीय..

# थाली बचाव!

रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास म्हणतात की चालू आर्थिक वर्षाच्या तिसऱ्या तिमाहीच्या अखेरीस चलनवाढीचा वेग मंदावेल. छान. ही तिसरी तिमाही म्हणजे ऑक्टोबर ते डिसेंबर. म्हणजे सर्व सण-वार संपल्यावर महागाई कमी होईल. ज्या वेळी फारशी काही खरेदी करावयाची नसते त्या वेळी दर कमी होतील. हा युक्तिवाद त्यांनी व्याजदर कपातीच्या संदर्भात केला. चलनवाढीवर एक उतारा हा व्याजदर वाढीचा असतो. व्याजदर वाढले की पैशाचा पुरवठा कमी होतो आणि चलनवाढ टळते. अलीकडेच झालेल्या रिझर्व्ह बँकेच्या बैठकीत व्याजदर कपातीचा मुद्दा आला असता ती करण्याविरोधात बहुमताने निर्णय घेतला गेला. त्याआधी काही आठवड्यांपूर्वी विद्यमान सरकारातील काही विद्वानांनी महत्त्वाचे खाद्यपदार्थ घटक चलनवाढ निर्देशांक मापनातून वगळण्याची सूचना केली होती. या घटकांमुळे महागाई झाल्याचे दिसून येते, म्हणून त्यांस निर्देशांक मापनातून वगळावे अशी या अधिकाऱ्यांची मसलत. या सूचनेची तुलना महाराष्ट्रातील शिक्षण आराखड्यातील गणित या विषयासंदर्भातील निर्णयाशी करता येईल. शालेय विद्यार्थ्यांस जे विषय जड जातात, त्यात गणित अग्रक्रमावर. यात अनुत्तीर्ण होणाऱ्यांचे प्रमाणही अधिक. ही अनुत्तीर्णांची संख्या कमी करण्यासाठी आपले राज्य सरकार उत्तीर्णतेची किमान गुणांची आवश्यकता ३५ वरून २० वर आणू पाहते. म्हणजे कमी विद्यार्थी अनुत्तीर्ण होतील, हा हिशेब. हा तर्कवाद पुढे नेल्यास काही सरकारी विद्वान; 'गणित हा विषय अभ्यासक्रमातून काढूनच टाका' असे सुचवणार नाहीतच असे नाही. म्हणजे गणितात कोणी अनुत्तीर्ण होण्याची शक्यताच नाही. तद्वत महागाई निर्देशांकातून दैनंदिन खाद्यापदार्थच काढून टाकले तर महागाईही नाहीशी होईल. याचा प्रतिवाद 'द हिंदु'ने नुकत्याच प्रकाशित केलेल्या विशेष लेखाने करता येईल.

कोणत्याही घरातील जेवणाच्या ताटातील किमान घटकांसाठी गेल्या वर्षी या काळात किती पैसे मोजावे लागले होते, आता या घटकांची किंमत काय आहे, गेल्या वर्षी या काळात सर्वसाधारण कामगारांचे वेतन काय होते, ते आता किती आहे या साध्या घटकांचा तपशील त्यांनी सादर केला आणि जेवणाच्या ताटातील घटकांची किंमतवाढ आणि सामान्यांसाठी झालेली-न झालेली वेतनवाढ यांच्याशी या घटकांची तुलना केली. खरे तर दैनंदिन अर्थशास्त्र समजून घेणे इतके सोपे आहे. यास गणप्याचे अर्थशास्त्र असे विद्वतजनांकडून हिणवले जात असले तरी गणप्यासही कळावे इतकी सुलभता या विद्वानांस आपल्या प्रतिपादनात आणता येत नाही. ती सुलभता आणणे हे पत्रकारितेचे खरे काम. 'द हिंदु'तील लेख हे करतो. चौरस आहारासाठी लागणाऱ्या घटकांतील दरवाढ यात मोजण्यात आली आहे. उदाहरणार्थ २५ ग्रॅम हिरव्या मिरच्या (दरवाढ २६.३ टक्के), २५ ग्रॅम लसूण (१२८ टक्के), पाव किलो टोमॅटो (२४७ टक्के), बटाटे (१८० टक्के), कांदे (५१.७ टक्के), कणीक (पाव किलो ३ टक्के), तांदूळ (अर्धापाव ०.७ टक्के घट), तूरडाळ (अर्धापाव २.६ टक्के घट) असे वेगवेगळे घटक यात विचारात घेतले गेले. गतसाली एका व्यक्तीच्या दोन वेळच्या जेवणाचा स्वयंपाक करण्यास लागणाऱ्या जिन्नसांसाठी १०१.८ रु मोजावे लागत. यंदा तेव्हढ्याच जेवणासाठी त्याच घटकांसाठी खर्च करावी लागणारी रक्कम १५४.४ रु इतकी आहे. गतसाली एका व्यक्तीच्या महिनाभराच्या दोन वेळच्या जेवणासाठी ३,०५३ रु लागत. आज हीच रक्कम ४,६३१ रु. इतकी आहे. आणि हे सर्व फक्त शाकाहारींसाठी. यात इंधनाचे खर्च धरण्यात आलेले नाहीत. ही मांडणी फक्त खाद्यान्नांसाठीच्या जिन्नसांच्या मूल्याबाबत आहे. याचा अर्थ एका व्यक्तीच्या दोन जेवणांच्या खर्चासाठीच्या रकमेत गेल्या १२ महिन्यांत तब्बल ५२ टक्के इतकी वाढ झाली. याची दखल का घ्यावयाची? प्रमुख कारणे तीन.

पहिले म्हणजे ही सर्व पाहणी महाराष्ट्रवासींचे जीवनमान गृहीत धरून करण्यात आलेली आहे. यातील सर्व घटकांचे या राज्यातील दर फक्त यात विचारात घेण्यात आलेले आहेत. टोमॅटो, बटाटा, कांदा यांच्या दरांत झालेली दरवाढ सामान्यांचे डोळे पांढरे करणारी आहे. ती किती आहे याचा तपशील वर आहेच. तथापि या खेरीज घराघरांतील जेवणांत वापरल्या जाणाऱ्या साध्या साध्या भाज्यांच्या दरांतही सरासरी ८९ टक्के इतकी दरवाढ गेल्या फक्त १२ महिन्यांत झाली. तिचा विचार करण्याचे आणखी एक कारण म्हणजे याच काळात झालेली वेतनवाढ. ती सरासरी ९ ते १० टक्के इतकीच आहे. याचा अर्थ उत्पन्न, एकंदर चलनवाढ आणि दोन जेवणांस आवश्यक किमान वस्तूंच्या दरांत झालेली दरवाढ यांचा कसलाही ताळमेळ नाही. म्हणजेच सामान्यांस हातातोंडाशी गाठ घालणे दिवसागणिक जिकिरीचे होऊ लागलेले आहे. यातील सामाजिक अंगही तितकेच महत्त्वाचे. म्हणजे हे सर्व सरासरी झाले. सरासरी ही बव्हंश: आकर्षक आणि सुखावणारी असू शकते. पण समाजात असमान जगणे वाट्यास आलेले घटकही महत्त्वाचे असतात. म्हणजे एकल माता, अनाथाश्रमातील जगणे वाट्यास आलेले, तितकेही नशिबात नाही असे बेघर, रोजगाराच्या प्रतीक्षेत असलेल्यांची घरे आदी मुद्दे विचारांत घेतल्यास अशांचे जगणे अधिकच महाग झाले असणार, हे उघड आहे. खेरीज स्त्री-पुरुष भेद यातही आहे. म्हणजे रोजगारावरील पुरुष मजुरांच्या वेतनात होणारी वाढ आणि महिला मजुरांचा रोजगार यात तफावत असते. त्यामुळे महिलांच्या उत्पन्नावर अवलंबून असलेल्या घरांसमोर अधिक मोठे आव्हान उभे राहते. हे वास्तव गंभीर असे.

आणि या वास्तवाचे कसलेही प्रतिबिंब याच राज्याचे भवितव्य ठरवण्यासाठी होत असलेल्या निवडणुकांत नाही, हे याचा विचार का करायचा याचे तिसरे कारण. राजकारण असे सामान्यांच्या जगण्यापासून इतके तुटलेले कधीही नव्हते. जनसामान्य आणि निवडणुकांच्या रिंगणात उतरलेले यांचा काडीचाही संबंध नाही, असेही महाराष्ट्रात इतक्या प्रमाणावर कधी घडलेले नव्हते. यात कळीचा आणि तितकाच वेदनादायी मुद्दा आहे तो या वास्तवास झाकून ठेवण्याच्या राजकारण्यांच्या प्रयत्नांत-त्यातही अधिक सत्ताधाऱ्यांस-येत असलेले यश. राज्यातील जाती/प्रजाती/पोटजाती/उपजाती असे अधिकाधिक भेद करावेत, या लहान लहान गटाच्या त्याहूनही लहान नेत्यांस जवळ करावे, आंजारून-गोंजारून, योग्य ते दाम मोजून त्याचा गंड आणि कंड शमवावा आणि त्या बदल्यात त्या लहानग्या नेत्याने आपल्या 'समाजा'चा पाठिंबा हे सर्व करणाऱ्यांस जाहीर करावा, हेच सध्या सुरू आहे. वास्तवात बेरोजगार दलित असो वा मराठा. त्याच्या वेदना सारख्याच असतात. परंतु आर्थिकदृष्ट्या सबळ वर्गातील समाजाची प्रतिकूल परिस्थितीस तोंड देण्याची क्षमता नेहमीच अधिक असते.म्हणजे सर्व गाडा खरे तर आर्थिक मुद्द्यावर येऊन थांबायला हवे. पण तसे करावयाचे तर हिशेब द्यावा लागणार. त्यापेक्षा सामाजिक गंडास फुंकर घालणे सोपे. त्यामुळे मूठभरांचा अहं सुखावतो आणि त्यावरच ही मंडळी समाधान मानून शांत होतात. पण त्यामुळे ना प्रश्नाचा आकार बदलतो ना त्यांची संख्या कमी होते. या साध्या वास्तवाकडे राज्यातील जनसामान्यांची डोळेझाक होत आहे हे दुर्दैव. ते विद्यामान निवडणुकांत पुरेपूर दिसते. सर्वच क्षेत्रातील महाराष्ट्राची पीछेहाट या मंडळींच्या गावीही नाही. म्हणून या मंडळींच्या इच्छेवर 'ताली बजाव' वादनात सहभागी न होता आपल्या जेवणाच्या 'थाली बचाव'चा विचार अधिक व्हायला हवा. तितका सुज्ञ महाराष्ट्रातील मतदार आहे का या प्रश्नाच्या उत्तरात निवडणुकीचे भवितव्य आहे.

# लाडकी बहीण, महायुतीचे आधार कार्ड

विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी मिळविण्यावरून सर्वच राजकीय पक्षांत संघर्षाला उधाण आले आहे. यावेळी मोठ्या प्रमाणावर बंडखोरी होणार, याची सर्वच पक्षांना जाणीव आहे. विधानसभेत जाण्यासाठी पुढील पाच वर्षे थांबण्याची कोणाची तयारी नाही हे त्यामागचे खरे कारण आहे. बड्या नेत्यांचे सगेसोयरे, कुटुंबीय यांना उमेदवारी दिली जाते म्हणून नाराजी असली तरी त्या कुटुंबाची ताकद मोडून काढणे सोपे नाही हे वरिष्ठांना चांगले ठाऊक आहे. सत्ता मिळविण्यासाठी पक्षाला प्रत्येक आमदाराची गरज आहे. म्हणूनच निवडून येण्याची क्षमता असलेल्या इच्छुकालाच उमेदवारी देण्यात येत आहे. मॅन पॉवर, मनी पॉवर नि मसल पॉवर ज्याकडे हे तीन एम आहेत, त्याला पक्षाची उमेदवारी निश्चित मानली जाते. महाराष्ट्रात विधानसभेच्या २८८ जागा आहेत. लोकसभा निवडणुकीत राज्यात भाजपाला मोठा फटका बसला. भाजपा विरोधात मतदान झाले. विधानसभा निवडणुकीत पुन्हा महाआघाडीला यश मिळेल असे सर्वत्र वातावरण बनले. पण हरियाणा विधानसभेचे निकाल आले आणि राज्यात भाजपाला पुन्हा ऊर्जा मिळाली. हरियाणात काँग्रेस सत्तेवर येणार अशी सर्व सर्व्हेची आकडेवारी सांगत असताना तेथील मतदारांनी पुन्हा भाजपाला सत्तेवर निवडून दिले. हरियाणात भाजपाने विजयाची हॅटट्रीक संपादन केली. लोकसभेत भाजपाला बहुमतापासून मतदारांनी दूर ठेवले तरी भाजपाची लोकप्रियता कमी झालेली नाही, हे हरियाणाच्या मतदारांनी दाखवून दिले.हरियाणाच्या निकालाने महाआघाडीच्या नेत्यांना महाराष्ट्रात जमिनीवर आणण्याचे काम केले. म्हणूनच विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रात नेमके काय होणार हे नामांकित ज्योतिषांना सांगणेही कठीण झाले आहे. विधानसभा निवडणुकीनंतर महाराष्ट्रात राजकीय स्थिरता असेल काय हा सर्वात महत्त्वाचा प्रश्न आहे. केंद्रात आपले सरकार आहे म्हणून निकालानंतर आपण कशाही सोंगट्या फिरवू शकतो असे आता भाजपाला करता येणार नाही. सन २०१९ ते २०२४ या पाच वर्षांत महाराष्ट्रातील राजकीय पक्षांनी अक्षरश: धुडगूस घातला. पाच वर्षांत तीन मुख्यमंत्री या राज्याने बघितले. देवेंद्र फडणवीसांचे ८० तासांचे सरकार, नंतर उद्धव ठाकरे यांचे अडीच वर्षांचे आघाडी सरकार व त्यानंतर एकनाथ शिंदे यांचे महायुतीचे सरकार या जनतेने अनुभवले आहे. विशेष म्हणजे कोणीही मुख्यमंत्री असले तरी अजितदादा पवार हे उपमुख्यमंत्री कायम आहेत, हा चमत्कारही याच पाच वर्षांत बघायला मिळाला. सलग पाच वर्षे मुख्यमंत्री राहिलेल्या देवेंद्र फडणवीस यांना एकनाथ शिंदे यांच्या सरकारमध्ये उपमुख्यमंत्री राहावे लागले, याची खदखद भाजपामधील त्यांच्या समर्थकांनी अनेकदा बोलून दाखवली. आता देवाभाऊंना भावी मुख्यमंत्री म्हणून त्यांच्या समर्थकांनी काही ठिकाणी फलकांवरही झळकवले. लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्राने महाआघाडीला झुकते माप दिले हाच भाजपाचा नि महायुतीचा मोठा पराभव होता. ४८ पैकी केवळ १७ मतदारसंघांत महायुतीचे खासदार निवडून आले ही भाजपा-शिवसेना (शिंदे) व राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) यांच्यावर मोठी नामुष्की होती. भाजपाच्या खासदारांची संख्या २१ वरून ९ वर घसरली म्हणून पक्षाने कोणाला जबाबदार धरले नाही याचेच मोठे आश्चर्य वाटते.राज्यात व केंद्रात सत्ता असून आणि उद्धव ठाकरे व शरद पवारांचे पक्ष फोडूनही भाजपाला लाभ मिळवता आला नाही. उलट सत्तेसाठी झालेली तोडफोड मतदारांना पसंत पडली नाही, हाच लोकसभा निकालाचा संदेश होता. राज्यात एकीकडे मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे यानी कंबर कसली आहे, भाजपाला निवडणुकीत धडा शिकविण्याची ते भाषा बोलत आहेत. विशेष म्हणजे आंदोलकांचे नेते शरद पवार, एकनाथ शिंदे किंवा अजितदादा पवार या दिग्गज मराठा नेत्यांवर एका शब्दाने टीका करीत नाहीत. त्यांचे निवडणुकीतील टार्गेट हे देवेंद्र फडणवीस आणि भाजपाचे उमेदवार आहेत. मराठा समाजाला शिंदे सरकारने दहा टक्के आरक्षण देऊनही आंदोलक नेत्यांचे समाधान झालेले नाही. मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळाले पाहिजे, हा हट्ट त्यांचा कायम आहे. मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र द्यावे या मागणीपासूनही ते माघार घेण्यास तयार नाहीत. जरांगे यांनी मराठा आरक्षणासाठी आजवर सहा उपोषणे केली. त्यांच्या पाठीशी विशेषत: मराठवाड्यात मराठा समाज एकवटला आहे, हेच दृश्य वेळोवेळी बघायला मिळाले. मराठा समाजाची नाराजी नुकसानकारक ठरू नये यासाठी भाजपाला विशेष प्रयत्न करावे लागणार आहेत. हरियाणात जाट समाज काँग्रेसच्या पाठीशी एकवटला असल्याचे चित्र होते, तेव्हा भाजपाने बिगर जाट समाजाची मोट बांधून मोठी व्होट बँक उभी केली. तसेच महाराष्ट्रात बिगर मराठा समाजांना एकत्र आणणे ही भाजपाची मोठी कसोटी ठरणार आहे. धनगर समाजाला अपेक्षित आरक्षण मिळाले नाही म्हणून धुसफूस आहेच. शिवाय प्रहार संघटनेचे बच्चू कडू, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे राजू शेट्टी, छत्रपती संभाजी राजेंची स्वराज संघटना, अशी तिसरी आघाडी मैदानात उतरली आहे. राज ठाकरे यांची महाराष्ट्र नवनिर्माण सेना स्वबळावर रणसंग्रामात उतरली आहे. मुंबई, ठाणे, पुणे, नाशिकमध्ये महायुतीला किंवा महाआघाडीला मनसेकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. त्याशिवाय प्रकाश आंबेडकर यांची वंचित बहुजन आघाडी मते खेचणारच आहे. महायुतीत असूनही रामदास आठवले यांच्या पदरात काही भरीव पडलेले दिसत नाही. महाआघाडी व महायुती यामधील सहा राजकीय पक्षांची उमेदवारी ज्यांना मिळणार नाही, ते आपली ताकद या निवडणुकीत दाखवणार हे निश्चित आहे. आघाडी व युतीला त्यांच्याच पक्षातील बंडोबांशी मोठा सामना करावा लागणार आहे. हरियाणात एका काँग्रेस नेत्याच्या अहंकार व एकाधिकारशाहीपुढे पक्षात अन्य कोणाला विश्वासात घेतले गेले नव्हते, तशा चुका महाराष्ट्रात होऊ नयेत, दक्षता घेणे हे काँग्रेसचे हायकमांडचे काम आहे. हरियाणात भूपेंदिर सिंह हुड्डा यांच्या फाजिल आत्मविश्वासामुळे विजयाच्या टप्प्यात आलेली निवडणूक काँग्रेसला पराभवाकडे घेऊन गेली तसा फटका महाराष्ट्रात नाना पटोलेंच्या स्वभावमुळे बसू नये असे आघाडीतील नेत्यांनी बोलून दाखवले आहे. राज्यात भाजपा म्हणजे देवेंद्र फडणवीस हेच आहेत. देवेंद्र हाच भाजपाचा महाराष्ट्रातील चेहरा आहे. मोदी, शहा किंवा नड्डा यांचा सर्वाधिक विश्वास फडणवीसांवर आहे. भाजपाच्या जाहीर झालेल्या पहिल्या यादीत पहिले नाव देवेंद्र फडणवीस यांचे होते ही त्याची झलक आहे. चंद्रशेखर बावनकुळे हे प्रदेशाध्यक्ष असले तरी पक्षाचे केंद्रस्थान मुंबईतील मलबार हिलवरील सागर बंगला हाच आहे. एकनाथ शिंदे यांची ठाकरेंच्या शिवसेनेत नंबर २ अशी कधीच ओळख नव्हती. आता ते राज्याचे मुख्यमंत्री आहेत तसेच महायुतीचे नंबर १ चे नेते आहेत. महायुतीचा मुख्यमंत्रीपदाचा चेहरा कोण हे जरी जाहीर झाले नसले तरी महायुती ही एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वाखाली विधानसभा निवडणुकीला सामोरे जात आहे हे भाजपाने सुद्धा मान्य केले आहे. एकनाथ शिंदे यांनी ठाकरेंच्या शिवसेनेत चाळीस आमदारांसह बंड करण्याची जी हिम्मत दाखवली त्याला तोड नव्हती. त्यांच्या बंडाने शिवसेनाप्रमुखांच्या पुत्राला, उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्रीपदावरून पायउतार व्हावे लागले. भाजपाच्या आशीर्वादाने व संरक्षक कवचाने एकनाथ शिंदे हे महाराष्ट्राच्या सर्वोच्च सिंहासनावर बसले असले तरी संपूर्ण महाराष्ट्रात अल्पावधीत जनतेचा नेता अशी त्यांची प्रतिमा निर्माण झाली आहे.

रोज १८ तास काम करणाऱ्या या नेत्याकडे दूरदृष्टी आहे. कामाचा झपाटा आहे. कमी वेळात विकासाची कामे मार्गी लावण्याचे कौशल्य आहे आणि उद्योग व्यवसायात प्रचंड गुंतवणूक त्यांनी महाराष्ट्रात आणली आहे. एवढी ऊर्जा, उत्साह, कार्यक्षमता, तत्परता त्यांच्याकडे येते कोठून? भाजपापेक्षा कोणत्या नेत्यापेक्षा आपण सरस आहोत हे त्यांनी आपल्या कामांनी सिद्ध करून दाखवले आहे. म्हणूनच मोदी-शहांचा थेट विश्वास संपादन करण्यात ते यशस्वी झाले आहेत. कार्यकर्ते संभाळणारा, लोकप्रतिनिधींची कामे विनाविलंब करणारा हा नेता आहे. शहरी व ग्रामीण भागातील जनतेला आपला नेता मुख्यमंत्रीपदावर आहे, असे वाटते, हीच त्यांच्या कामाची पावती आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना ही तर गेम चेंजर ठरणार आहे. लोकसभा निवडणुकीत महायुतीचे झालेले नुकसान लाडकी बहीण भरून काढणार आहे. या योजनेमुळे दोन कोटी तीस लाख बहिणींची व्होट बँक एकनाथ शिंदे यांनी आपलीशी केली आहे. लाडकी बहीण योजनेने महाआघाडीला धडकी भरली आहे. आपण लाडक्या बहिणींना दरमहा तीन हजार रुपये देऊ, या आश्वासनाने बहिणी सुखावल्या आहेत. ही योजना बंद होणार नाही, हा फार मोठा दिलासा एकनाथ शिंदे यांनी दिला आहे. लाडकी बहीण योजनेच्या श्रेयवादावरून महायुतीत चढाओढ असली तरी हीच योजना हे महायुतीचे आधार कार्ड ठरणार आहे.

# आघाडीचे अस्वस्थ नेते, रेवड्यांची खैरात



सत्ता नसल्याने राजकीय पक्षांचे नेते कसे सैरभैर होतात हे महाआघाडीच्या मुंबईतील प्रचारसभेतून दिसून आले. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस व उबाठा सेना हे तीनही पक्ष उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील सरकारमध्ये राज्यात अडीच वर्षे सत्तेवर होते. शरद पवारांच्या कल्पक योजनेतून महाविकास आघाडीचा जन्म झाला आणि ठाकरे यांच्या पक्षाला त्यांनी शिताफीने भाजपापासून दूर करून आपल्या कळपात घेतले. केवळ सत्तेसाठी एकत्र आलेली मोट फार काळ टिकली नाही. तीनही पक्षांचे आचार-विचार वेगळे. तिन्ही पक्षांत अनेक नेते महत्त्वाकांक्षी. काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसने ठाकरे यांना मुख्यमंत्रीपदाच्या मखरात बसवले पण त्यांना सत्ता राबवता येत नाही, ठाकरे यांना सरकार चालवता येत नाही, ठाकरे यांना आपल्या स्वत:च्या पक्षाचे आमदार संभाळता येत नाहीत याचेच दर्शन सर्व महाराष्ट्राला घडले. ठाकरे यांचे नेतृत्व कसे कुचकामी आहे याचाच अनुभव महाराष्ट्राला आला व त्याचा लाभ भाजपाला मिळाला.

काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस यांनी सत्ता अनेक वर्षे उपभोगली आहे. ठाकरे यांनीही मुख्यमंत्रीपदाची ऐश अनुभवली आहे. त्यामुळे हे तीनही पक्ष सत्तेशिवाय राहू शकत नाहीत. एकदा सत्तेची चटक लागली की, वाटेल ते करून सत्तेच्या परिघात जाण्यासाठी तडफड सुरू होते, तसेच महाआघाडीच्या मुंबईतील बीकेसी मैदानावर झालेल्या प्रचारसभेत दिसून आले. महाराष्ट्रातील विधानसभेच्या २८८ जागांसाठी येत्या २० नोव्हेंबरला मतदान होणार आहे. राज्याच्या राजधानीत सभा घेतली की, त्याचे थेट प्रक्षेपण वृत्तवाहिन्यांवरून होते व घराघरांत प्रचार पोहोचतो. काँग्रेस पक्षाचे सर्वेसर्वा राहुल गांधी, पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार)चे अध्यक्ष शरद पवार, उबाठा सेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, मुंबई काँग्रेसच्या अध्यक्षा खासदार वर्षा गायकवाड अशा अनेक नेत्यांची फौज या सभेत मंचावर उपस्थित होती. महायुती सरकारचा पराभव करा व महाआघाडीला विजयी करा, हा एकच अजेंडा या सर्व नेत्यांकडे आहे. मोदी, शहा, शिंदे, फडणवीस यांच्यावर जोरदार टीका केली म्हणजे मते आपल्याकडे वळतील अशा स्वप्नरंजनात हे सर्व नेते आहेत. महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीत महायुतीला विशेषत: भाजपाला मोठा दणका बसला म्हणून विधानसभा निवडणुकीत महाआघाडीचे नेते डोक्याला बाशिंग बांधून फिरत आहेत.तीन पक्षांची सभा व तीन पक्षांचे झेंडे या सभेत फडकताना दिसत होते. तीनही पक्षांचे कार्यकर्ते सभेला होते. त्यांना नेण्या-आणण्यासाठी शेकडो बसेसची व्यवस्था होती. पण अगोदरच्या तुलनेने महाआघाडीच्या सभेला गर्दी कमीच होती. जे लोक जमले होते, त्यांना पकडून आणले होते. सभेत कुठेही जोश नव्हता. टाळ्या घेणारा व गर्दी खेचणारा जबरदस्त वक्ता महाआघाडीकडे नाही, हे या सभेतून जाणवले. राहुल गांधींचे त्यातल्या त्यात आकर्षण. पण ते रोज तेच तेच बोलतात. संविधान बचावची हाळी देतात. खरे तर राहुल किंवा खरगे यांचे महाराष्ट्राला आकर्षण राहिलेले नाही. विधानसभा निवडणुकीत राष्ट्रीय मुद्दे चालत नाहीत, मग हे नेते बोलावून महाआघाडीला लाभ तरी काय होणार? खरगे सर्वात शेवटी बोलायला उठले. त्यांचे पद आणि त्यांचे वय बघून सभेत शिष्टाचार पाळला गेला हे उचित होते. पण ते माईकजवळ येताच लोक उठून निघाले. लोक मैदान सोडून जाऊ लागले, मला दहा मिनिटे द्या, अशी विनवणी खरगे यांना करावी लागली. पण लोकांना त्याबद्दल काहीच देणे-घेणे नव्हते. लोकांना काय पाहिजे, कोणाची भाषणे ते ऐकतात, हे जर महाआघाडीच्या नेत्यांना समजत नसेल, तर ते निवडणूक जिंकणार तरी कशी? सभेतील वक्ते भाजपाने ठाकरे सरकार पाडले म्हणून तुणतुणे वाजवत राहिले. त्यात त्यांनी नवीन काय सांगितले. आता अडीच वर्षांपूर्वीची सहानुभूती राहिली आहे का? भाजपाला संविधान कमकुवत करायचे आहे, असे सांगताना राहुल गांधी हातात लाल रंगाचे नोट पॅड उंचावून तावातावाने बोलताना दिसत होते. संविधान लाल रंगाचे कधी झाले? राहुल यांनी महाआघाडीची पंचसूत्री जाहीर करून मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न केला. महाआघाडी सत्तेवर आल्यावर आमचे सरकार महिलांना दरमहा ३००० रुपये देणार, राज्यात महिलांना बस प्रवास मोफत देणार, पंचवीस लाखांपर्यंत आरोग्य विमा व मोफत औषधे, जातिनिहाय जनगणना, आरक्षणाची ५० टक्के मर्यादा हटवणार, ३ लाखांपर्यंत शेतकऱ्यांना कर्जमाफी, नियमित कर्जफेड करणाऱ्याना ५० हजार प्रोत्साहन, बेरोजगार तरुणांना दरमहा ४ हजार रुपये इत्यादी महायुती सरकारच्या घोषणांची कॉपी करण्याचा प्रयत्न महाआघाडीने चालवला आहे.मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेतून सध्या दोन कोटींपेक्षा जास्त महिलांना दरमहा पंधराशे रुपये मिळू लागले आहेत. नोव्हेंबरचा हप्ता ऑक्टोबरमध्येच देण्याची किमया शिंदे सरकारने करून दाखवली. पुन्हा सत्ता मिळाल्यावर तीन हजार रुपये लाडक्या बहिणींना देऊ असे मुख्यमंत्री सांगत आहेत. म्हणून महाआघाडीने ४ हजार रुपयांचे आमिष युवकांना दाखवले आहे. दरमहा पंधराशे रुपये देण्यासाठी महायुती सरकारला ९० हजार कोटी लागणार आहेत. जर महिलांना दरमहा चार हजार रुपये दिले तर हा निधी कोठून आणणार यावर महाआघाडीचे नेते ब्र काढत नाहीत. महायुती सरकारने महिलांना निम्म्या तिकिटात एसटी बस प्रवासाची सवलत दिली आहेच. गरिबांना दरमहा पाच किलो धान्य मिळत आहे. शिवसेनाप्रमुखांच्या कल्पनेतून साकार झालेल्या एसआरए योजनेतून झोपडपट्टीवासीयांसाठी मोफत घरांची योजना चालूच आहे. जनतेची मागणी नसतानाही निवडणूक प्रचारात रेवड्यांचा वर्षाव चालू आहे. हे मोफत घ्या, ते मोफत घ्या पण आम्हाला सत्ता द्या, यासाठी महाआघाडीचे नेते घायकुतीला आले आहेत.

# एकनाथ शिंदे कोणत्या पदावर याला महत्त्व नाही, ते आता लोकनेते

## शिवसेना माजी आमदार शहाजीबापू पाटील यांचा दावा

**मुंबई (वृत्तसंस्था)–भाजपच्या आमदारांच्या रेट्यामुळे देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री झाले आहेत. मात्र, एकनाथ शिंदे हे आता कोणत्या खुर्च्यावर आहे त्याला इतिहासात महत्त्व राहिलेले नाही. जनतेच्या मनावर राज्य करणारे ते लोकनेते झाले असल्याचे शिवसेनेचे आमदार शहाजीबाबू पाटील यांनी म्हटले आहे. विधानसभा निवडणुकीनंतर एकनाथ शिंदे यांनी उपमुख्यमंत्री पद स्वीकारले आहे. या पार्श्वभूमीवर शहाजीबाबू पाटील यांनी केलेले हे वक्तव्य महत्त्वाचे मानले जात आहे.मुख्यमंत्री पदावर विराजमान झाल्यानंतर एकनाथ शिंदे पुन्हा उपमुख्यमंत्री पद स्वीकारतील याबाबत शाशंकता व्यक्त केली जात होती. एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री पद स्वीकारण्यास तयार नसल्याच्या बातम्या देखील समोर आल्या होत्या. मात्र, अखेर शपथविधीच्या दिवशी एकनाथ शिंदे यांनी उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. त्यामुळे या सर्व घडामोडी बाबत राज्यात चर्चा सुरू आहे. यातच शहाजीबापू पाटील यांनी एकनाथ शिंदे हे आता लोकनेते असल्याचा दावा केला आहे.**



शहाजीबापू पाटील यांनी उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांच्यावर देखील पलटवार केला आहे. संजय राऊत यांचे घर भूईसपाट झालेले आहे. त्यातील पत्र, विटा जे काही चांगले असतील, तर ते गोळा करा आणि तुमची झोपडी बांधा, अशा शब्दात त्यांनी संजय राऊत यांना खोचक सल्ला दिला आहे. संजय राऊतांनी शिवसेनेचे तुकडे करून टाकले आहेत. आता उरली सूरली ठाकरेंच्या शिवसेनेचे वाटोळ केल्याशिवाय ते गप्प बसत नाही, असे देखील शहाजीबापू पाटील यांनी म्हटले आहे. या माध्यमातून शहाजीबापू पाटील यांनी संजय राऊत यांच्यावर निशाणा साधला. बॅलेट पेपर मतदान घेतल्यानंतर मतमोजणीच्या दिवशी भाजपचे नेते देश सोडून पळून जातील, असे वक्तव्य राऊत यांनी केले होते. यावरून शहाजीबापूंनी राऊतांवर टीका केली आहे.संजय राऊत हा संध्याकाळी वेगवेगळी दिव्य स्वप्ने पाहणारा माणूस आहे. जे स्वप्न संध्याकाळी पाहतात ते सकाळी टीव्ही समोर सांगण्याची त्यांची सवय असल्याचे शहाजीबापू पाटील यांनी म्हटले आहे. अजित पवार यांनी शरदचंद्र पवार गटाचे पाच खासदार फोडले तरच त्यांना केंद्रात मंत्रीपद मिळेल, असा दावा संजय राऊत यांनी केला होता. यावरून शहाजीबापू यांनी संजय राऊत यांना सुनावले आहे. अजित पवार यांना भाजपने कोणतीही अट घातली नाही, हे मी खात्रीने सांगू शकतो, असा दावा देखील त्यांनी केला आहे.विधानसभेला विरोधकांचा दारुण पराभव झाला आहे. त्यामुळे त्यांना घराच्या बाहेर पडणे देखील मुश्किल झाले आहे. मात्र घराच्या बाहेर पडण्यासाठी आणि राजकारण पुन्हा कसे पुढे जायचे, यासाठी त्यांनी शोधलेला मार्ग म्हणजे ईव्हीएम मशीनवरील आक्षेप असल्याचे शहाजीबापू पाटील यांनी म्हटले आहे. मात्र जनतेने विरोधकांना नाकारले असल्याचा दावा देखील शहाजी बापू पाटील यांनी केला आहे.आगामी मंत्री मंडळामध्ये शहाजीबापू पाटील यांचा समावेश होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या पार्श्वभूमीवर देखील शहाजीबापू पाटील यांनी सुचक विधान केले आहे. पक्ष वाढीसाठी एकनाथ शिंदे आपल्यावर पक्ष पातळीवर किंवा शासकीय पातळीवरची मोठी जबाबदारी देतील. ती चांगल्या पद्धतीने पार पाडणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे. एकनाथ शिंदे यांनी दिलेल्या संधीचा मी सोन करेल, असे देखील ते म्हणाले. मंत्रिमंडळ विस्तारामध्ये शहाजीबापू पाटील यांना मंत्रीपद मिळण्याची अपेक्षा आहे. या पार्श्वभूमीवर त्यांनी हे विधान केले आहे.

## बसस्थानक,शाळा, महाविद्यालयासह ट्युशन भागातील बंद पडलेले सीसीटीव्ही कॅमेरे चालू करून पोलीस गस्त वाढविण्यात यावी–पालकांची मागणी

**केज । प्रतिनिधी**

केज शहरातील मुख्य रस्त्यावरील, श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक,बसस्थानक, शाळा, महाविद्यालयासह ट्युशन भागातील बंद पडलेले सीसीटीव्ही कॅमेरे चालू करण्यात यावेत व वरील ठिकाणी पोलीस गस्त वाढविण्यात यावी अशी मागणी पालक वर्गातून केली जात आहे. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, केज शहरांमध्ये मोठमोठ्या शाळा, महाविद्यालय यासह कानडी रोड, वकीलवाडी, उमरी रोड सह शहरातील अनेक भागांमध्ये खाजगी ट्युशन क्लासेस आहेत. तत्कालीन सहाय्यक पोलीस अधीक्षक पंकज कुमावत साहेब व तत्कालीन पोलीस निरीक्षक शंकर वाघमोडे साहेब यांच्या कार्यकाळामध्ये शहरातील अनेक भागांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आलेले होते. त्यावेळेस पोलीस गस्त देखील मोठ्या प्रमाणात चालू होती. त्यामुळे पालकांना पाल्याच्या सुरक्षेतेची चिंता नव्हती. सदर ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे चालू असल्यामुळे व वेळोवेळी पोलिसांच्या दक्षतेमुळे उनाड टावळखोरांचा बंदोबस्त शहरांमध्ये चांगल्या प्रकारे झाला होता. दरम्यानच्या काळामध्ये शहरातील सीसीटीव्ही कॅमेरे बंद पडल्यामुळे मुलींच्या छेडछाडीचे प्रकार शहरात वाढत चाललेले आहेत शाळेत व महाविद्यालयात शहरासह ग्रामीण भागातील विद्यार्थी–विद्यार्थिनींची संख्या मोठ्या प्रमाणात आहे त्याचबरोबर खाजगी क्लासेस साठी देखील मोठ्या प्रमाणात विद्यार्थी व विद्यार्थिनींची गर्दी असते. याच गर्दीचा गैरफायदा घेत काही उनाड टवळखोर हे मुलींची छेडछाड करीत आहेत सदर प्रकारामुळे अनेक मुली व त्यांचे पालक त्रस्त झाले आहेत सध्या महिलांचा व मुलींच्या सुरक्षेतेचा प्रश्न ऐरणीवर आलेला आहे. तर काही पालकांनी भीतीपोटी मुलींना शाळा, महाविद्यालय व खाजगी क्लास मध्ये शिक्षण घेण्याचे बंद केले आहे. काही मुलींना शिक्षणापासून वंचित राहण्याची वेळ त्यांच्यावर आलेली आहे तर काही पालक



भयभीत झाल्यामुळे आपल्या पाल्यांना शिक्षणापासून वंचित ठेवण्याचा निर्णय घेत आहेत जर एखाद्या पालकांनी टावळखोरांची तक्रार केली तर आपल्या मुलींची समाजात बदनामी या भीतीपोटी पालक भयभीत झालेले आहेत. शाळेत महाविद्यालयामध्ये व ट्युशनला मुली जात असताना अनेक उनाड टवाळखोर हे मुलींच्या मागे फिरत त्यांचा पाठलाग करत छेडछाड करीत फिरत असतात. त्याचबरोबर ग्रामीण भागातील मुली त्यांच्या गावाकडे जाण्यासाठी बसस्थानकात एसटी ची वाट पाहत थांबलेला असतात त्याही ठिकाणी त्यांना त्रास देण्याचे काम काही टवळखोर मंडळी करत आहेत. सदर प्रकरणाकडे शाळा महाविद्यालय सह खाजगी शिकवणी घेणाऱ्या शिक्षकांनी देखील लक्ष देण्याची गरज आहे असे पालक वर्गातून बोलले जात आहे. तरी प्रशासनाने केज शहरात पूर्वीप्रमाणे शाळा,कॉलेज बसस्थानक, खाजगी ट्युशन विभाग यासह शहरातील मुख्य रस्त्यावर व श्री छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये बंद पडलेले सीसीटीव्ही कॅमेरे तात्काळ चालू करून सदर ठिकाणी पूर्वीप्रमाणे पोलीस गस्त चालू करण्यात यावी अशी मागणी पालक वर्गातून केली जात आहे.

## सरस्वती कन्या प्रशालेच्या गायत्री शिंदेचे बॉक्सिंग स्पर्धेत घवघवीत यश

**केज । प्रतिनिधी**

केज येथील सरस्वती कन्या प्रशालेच्या गायत्री शिंदे चे बॉक्सिंग स्पर्धेत घवघवीत यश संपादन केले आहे. माऊली विद्यापीठ केज संचलित सरस्वती कन्या प्रशाला केजच्या इयत्ता सहावीतील गायत्री शिंदे हिने जालना येथे पार पडलेल्या किक बॉक्सिंग क्रीडा स्पर्धेमध्ये विभागातून प्रथम क्रमांक पटकावला. राज्यस्तरावर तिची या स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

सरस्वती कन्या प्रशालेतील गायत्री शिंदे ही अतिशय कष्टाळू मुलगी असून तिने स्वकष्टाने जिल्हास्तरीय व विभागीय स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक संपादित केला आहे. तिला आता राज्यस्तरावरील स्पर्धेसाठी संस्थेच्या संस्थापिका तथा देशाच्या नेत्या खासदार आदरणीय सौ.रजनीताई पाटील यांनी हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.

तसेच संस्थेचे अध्यक्ष अशोक दादा पाटील, सचिव आदित्य दादा पाटील यांनी तिचे हार्दिक अभिनंदन केले आहे.

माऊली विद्यापीठाचे प्रशासकीय अधिकारी प्रताप मोरे सर सरस्वती कन्या प्रशालेच्या प्राचार्या घुले मॅडम व सरस्वती कन्या प्रशालेतील सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी तिचे अभिनंदन करून तिने राज्यस्तरावरील स्पर्धा जिंकावी अशा प्रकारची अपेक्षा व्यक्त करत तिला पुढील स्पर्धेसाठी प्रोत्साहन दिले आहे.



## गेवराईत चोरट्यांनी २ लाखाची बॅग पळवली

## मध्यवस्तीत भर दिवसा लुटल्याने खळबळ

### जिल्ह्यातले पोलीस करतायत काय?

**गेवराई । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात परळीतील गोळीबार, व्यापाऱ्याचे अपहरण आणि मस्साजोग येथील सरपंचाचे अपहरण करून झालेल्या हत्याची घटना चर्चेत असतानाच, गेवराई येथील बँकेतून घरी जाणाऱ्या शेतकरी राधाकिसन मोकिंदा कोठेकर यांच्या हातातून १ लाख ९९ हजार रुपयांची कापडी बॅग चोरट्यांनी हिसकावून पळवून नेल्याची घटना घडल्याने एकच खळबळ उडाली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, गेवराई शहरातील जुन्या बस स्थानका जवळ राष्ट्रीय महामार्गावरील बुलढाणा अर्बन बँकेची शाखा आहे. या शाखेतून राधाकिसन मुकिंदा कोठेकर आणि त्यांची पत्नी सौ शशिकला कोठेकर राहणार कोल्हेर रोड, गेवराई यांनी आपल्या खात्यातून काढलेले १ लाख ९९ हजार रुपये ची रक्कम घेऊन पशुवैद्यकीय दवाखाना



परिसरातून डॉक्टर काळे हॉस्पिटल मार्गे घराकडे निघाले होते. दरम्यान त्यांच्यावर पाळत ठेवलेल्या दोन चोरट्यांनी मोटरसायकलवर येऊन त्यांचा पाठलाग सुरू केला. श्री व सौ कोठेकर पती–पत्नी महात्मा फुले शाळे समोरील, तस्लिम किराणा समोर, मडके यांच्या घराजवळ येताच, पाठीमागून मोटर सायकलवर आलेल्या चोरट्यांनी राधाकिसन कोठेकर यांच्या हातात असलेली १ लाख ९९ हजार रुपयांची पिशवी जोरात हिसकावून पळवून नेली. हातातील रक्कम लंपास झाल्याचे कळताच कोठेकर यांनी आरडाओरड केली मात्र तोपर्यंत चोरटे मोटर सायकलवर पसार झाले. सदर घटना दिनांक १० डिसेंबर रोजी मध्यवस्तीत भर दिवसा १२ ते साडेबारा वाजेच्या दरम्यान घडली. याप्रकरणी वरील प्रमाणे गेवराई पोलीस ठाण्यात राधाकिसन मुकिंदा कोठेकर यांनी दिलेल्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्यांविरुद्ध बी एन एस २०२३, कलम ३०९(४), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# ‘अपार’ आयडीच्या कामात शिक्षकांची वाढली डोकेदुखी

## पालकाचे पोर्टलवर एक नाव तर आधारवर दुसरेच शिकवावं तर कधी,पालकांची वाढली चिंता

**छ. संभाजीनगर । प्रा.संजय तुपे**

शिक्षण विभागाने विद्यार्थीचा ’अपार आईडी चा आदेश काढला आणि इयत्ता १ ते १२ वी पर्यतचे सर्वच जिल्हा परिषद, खासगी अनुदानित शिक्षक विद्यार्थी यांच्या पालकांचे आधार कार्ड गोळा करत अपार आईडीच्या कामाला लावले आहे. शासकीय व निमशासकीय शाळांमध्ये शिक्षण निमशासकीय शाळांमध्ये शिक्षण विद्यार्थ्याची युनिक आयडी ऑटोमेटेड परमनंट ॲकॅडमिक अकाउंट रजिस्ट्री (एपीएआर) तयार करण्याचे काम शिक्षण विभागाने शिक्षकांवर सोपवले आहे. परंतु एपीएआरच्या कामालाही गती मिळत नाही. अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. तसेच आता दिवाळीनंतर शाळा सुरू झाली. आता शिकवायचे तर कधी आणि इतर शालेय काम करायचे कधी असा प्रश्न गुरुजींना पडला आहे. एकीकडे शिक्षण विभागाचे अधिकारी अपार यांच्यावर लवकरात लवकर ओळखपत्र तयार करण्यासाठी दबाव आणत आहेत. दुसरीकडे, यू–डायसप्लस पोर्टलवर नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांचे तपशील आणि पालकांचे आधार कार्ड तपशील जुळत नाहीत. कोणतीही दुरुस्ती करण्याचा अधिकार शाळेला नसल्याने अधिकच अडचणी वाढल्या आहे.

शाळाबाह्य विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाचा तपशील, गुणपत्रिका, विद्यार्थ्यांना शासनाकडून मिळणाऱ्या सोयी–सुविधा, शाळाबाह्य विद्यार्थी व अर्ध्यातून शाळा सोडलेल्या विद्यार्थ्यांचे प्रमाण कमी करून त्यांना पुन्हा शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात त्यांना आणण्यासाठी आता –झ––ठ ’अपार’ (ॲटोमेटेड पर्मनंट ॲकेडमिक रेजिस्ट्री) महत्त्वपूर्ण ’डिजीलॉकर’च्या ठरणार आयडी आहे. मदतीने ’अपार’मधून सर्व शैक्षणिक वर्षातील विद्यार्थ्यांच्या नोंदी पाहता येतील. आधार कार्डच्या धर्तीवर इयत्ता पहिली ते बारावीतील विद्यार्थ्यांना आता अपार आयडी तथा कार्ड दिले जाणार आहे. सुरवातीला नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांना ते कार्ड देण्यात येणार होते, पण आता सर्वांनाच दिले जात आहे. येणार होते, पण आता सर्वांनाच दिले जात आहे. या अपार आयडीचे रजिस्ट्रेशन मुलांच्या शाळांमध्येच करण्यात येणार आहे. यासाठी शाळांना पालकांचे ना हरकत प्रमाणपत्र लागणार आहे. पालकांचे व मुलाचे आधार कार्ड, पॅन किंवा मतदान ओळखपत्राचा वापर यासाठी केला जाणार आहे. ररिरी.शर्वीलरींळेप.सीं.ळप या वेबसाईटवर याचे रजिस्ट्रेशन होणार आहे. पालकाचे पोर्टलवर एक नाव तर आधारवर दुसरेच यू–डायसप्लस पोर्टलवर शालेय विद्याथ्र्याचे नाव त्याचे मूळ नाव अशी नोंद आहे. परंतृ बहुतेक विद्याथ्र्याच्या नावापुढे आडनाव नसल्याने लावल्याने हा प्रकार घडत आहे. यू डायस प्लस पोर्टिलवर पालक विद्याथ्र्यचि नाव एक आहे. मात्र आधार वर पालकाचे नाव बदबदलुन आहे. आडनाव जुळत नसल्याने अपार आयडीला आडकाठी येत आहे. अपार आयडीच्या कामात गुरूजी व्यस्त यू–डायस पोर्टल वरून तयार केला जात आहे आयडी विद्यार्थ्यांच्या या पोर्टलवर प्रविष्ट केलेले तपशील जसे की नाव, वडिलांचे नाव, जन्मतारीख इ. आधार कार्ड प्रमाणेच असणे आवश्यक आहे आणि पालकांच्या आधार तपशीलास ह देखील असणे आवश्यक आहे. अडचण अशी आहे की अनेक चुका सुधारण्यासाठी आधार कार्ड अपडेट करणे आवश्यक आहे, परंतु माहितीच्या अभावामुळे ते अपूर्ण राहत आहे,



# संविधानाच्या प्रतिकृतीची मोडतोड करणाऱ्याला फाशीची शिक्षा द्या

## भारतीय बौद्ध महासभेची मागणी

**बीड । प्रतिनिधी**

परभणी येथे दि. १० डिसेंबर रोजी दु.५.३० वा. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोरील राष्ट्रीय मानचिन्ह असलेल्या संविधानाच्या प्रतिकृतीची मोडतोड करून विटंबना केलेल्या देशद्रोही समाज कंटकाला तात्काळ फासीची शिक्षा देण्यात यावी आणि त्यामागील सुत्रधारी देशद्रोहांची सी.बी.आय. मार्फत तातडीने शोध लावून त्यांच्यावर देशद्रोहाची कारवाई करावी या मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी यांना देण्यात आले आहे. जिल्हाधिकारी यांना एका शिष्टमंडळाने भेट घेतली व निवेदन दिले याप्रसंगी भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष महालिंग निकाळजे, हनुमंतराव कांबळे, अनिल डोळस, गोपीनाथ बनसोडे, सर्जेराव मस्के, केतन गायकवाड, रमेश सोनवणे , किशोर वडवारे, सुभाष तागडे, महेंद्र वडमारे, प्रभाकर चांदणे, धम्मा पारवेकर, भैय्यासाहेब वाघमारे, भीमराव पायाळ, बबन वडमारे, गणपत डोळस यांच्यासह भारतीय बौद्ध सभेच्या पदाधिकारी, कार्यकर्ते व आंबेडकर प्रेमींच्या निवेदनावर स्वाक्षऱ्या आहेत.

भारतीय राज्यघटना हे भारत देशाचे मानचिन्ह आहे. या राज्यघटनेनुसार भारत देश आज आधुनिक राष्ट्र म्हणून उभे राहताना आणि संपुर्ण जगात भारतीय राज्यघटनेचे गौरव केले जात असताना मराठवाड्यातील जिल्हा परभणी येथे देशद्रोह्यांनी दि.१०/१२/२०२४ रोजी दु.५.३० वा. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोरील भारत देशाचे मानचिन्ह असलेल्या संविधानाच्या प्रतिकृतीची मोडतोड करून देशद्रोह केली आहे. हा देशद्रोहाचा गुन्हा आहे. त्यामुळे सामाजिक उद्रेक उफाळून येत आहे. कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. या देशद्रोही घटनेचा सर्वत्र निषेध केला जात आहे. आम्ही या देशद्रोही घटनेचा तीव्र निषेध करतो.समाज कंटकांनी यापुढे असे देशाविरुद्ध देशद्रोह करू नये. देशाच्या सरकारचे, राज्यघटनेचे आणि नागरीकांचे अवमूल्यन करू नये म्हणुन सदरहू देशद्रोहांना तातडीने फाशीची शिक्षा देण्यात यावी. आणि त्यामागील सूत्रधारी समाज कंटाकांचा सी.आय.डी. मार्फत शोध लावून त्यांच्याविरुद्ध देशद्रोहाची कारवाई तातडीने करण्यात यावी. तसेच संपूर्ण देशातील शासकीय कार्यालयासमोर देशाचे मानचिन्ह म्हणून संविधानाची प्रतिकृतीची उभारणी करण्यात यावी आणि त्याचे संरक्षण करून संविधानाचा यथोचित सन्मान राखावा. शासनाची ही कृतीशील भुमिकाच माथेफिरू देशद्रोहांच्या कुकृतीचे चांगले उत्तर ठरेल. अन्यथा यासाठी सामाजिक उद्रेक झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी सरकारवर राहील.




# गंगापूरचे शासकीय कार्यालय बनले भ्रष्टाचाराचे कुरण

## भुमी अभिलेख कार्यालयाचे दोन कर्मचारी लाचेच्या जाळ्यात अडकले

**छ. संभाजी नगर । प्रा संजय तुपे**

गंगापूर येथे ३५ हजारांची लाच घेताना गंगापूर येथील भूमी अभिलेख कार्यालयातील भुमापकासह शिपाई लाचेच्या जाळ्यात अडकले असून सर्व शासकीय कार्यालय सध्या भ्रष्टाचाराचे कुरण बनले आहे.

प्राप्त माहितीनुसार गंगापूर भूमी अभिलेख कार्यालयातील शिपाई संदीप फतपुरे व भुमापक उमेश गायकवाड असे नाव असून त्यांनी ३५ हजार रुपयांची लाच मागितली होतीतक्रारदार यांनी मौजे, तांदुळवाडी तक्रारदार यांनी मौजे, तांदुळवाडी ता. गंगापूर येथील गट नंबर १३९ मधील जमीन विक्री केली असून सदर जमीन मोजणी करून हद्द खुणा करुन नकाशा तयार करून देण्यासाठी संदीप फतपुरे व उमेश गायकवाड यांनी १२डिसेंबर रोजी पन्नास हजार रुपये लाचेची मागणी करून, उमेश गायकवाड यांनी तडजोडी अंती पस्तीस हजार रुपये स्वीकारण्याचे मान्य केले, त्यानंतर दिनांक १३ डिसेंबर रोजी सापळा आयोजन केले असता दोन्ही आरोपींनी पंच साक्षीदारा समक्ष शेंदुरवादा ते बिडकीन रोडवर, मांडवा फाटा येथे पस्तीस हजार रुपये लाच स्वीकारली असून त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. पो.स्टे गंगापूर येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक संदीप आटोळे, अप्पर पोलीस अधिक्षक मुकुंद अघाव उपअधीक्षक सुरेश नाईकनवरे यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी केशव दिंडे, पोलीस निरीक्षक, सहाय्यक अधिकारी विजय वगरे, पोलीस निरीक्षक व सापळा पथक पो.ह. नागरगोजे, तोडकर, पो.अं.चा. बागुल यांनी सापळा रचून आरोपींना रंगेहाथ पकडले.



# घनसावंगी तहसील कार्यालयात १६ डिसेंबर रोजी लोकशाही दिनाचे आयोजन

**जालना । असलम कुरेशी**

शासन परिपत्रक दिनांक २६ सप्टेंबर, २०१२ नुसार सर्वसामान्य जनतेच्या तक्रारी/अडचणी यांची न्याय व तत्परतेने शासकीय यंत्रणेकडून सोडवणूक करण्यासाठी एक प्रभावी उपाययोजना म्हणून लोकशाही दिन हा तालुका स्तरावर राबविण्याचे निर्देश दिलेले असून प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी लोकशाही दिनाचे आयोजन करावे. त्यामुळे अखिल भारतीय ग्राहक पंचायत यांच्या निवेदनाच्या अनुषंगाने दिनांक १६/१२/२०२४ रोजी तहसील कार्यालय, घनसावंगी येथे लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

तालूका लोकशाही दिन कार्यक्रम तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखाली होणार असून त्यामध्ये गटविकास अधिकारी, पोलिस निरीक्षक, तालुका आरोग्य अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, पशु वैद्यकीय अधिकारी, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी, सहाय्यक निबंधक, मुख्याधिकारी, नगर पंचायत उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम उप अभियंता, मृद व जलसंधारण उप अभियंता, जि.प.बांधकाम, दुय्यम निबंधक, एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी, उप अभियंता, जलसंधारण जि.प. उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, यांचे तालुक्यातील विविध विभागाचे अधिकारी उपस्थित राहणार आहेत. सदरील लोकशाही दिनामध्ये तक्रार/निवेदन वैयक्तिक स्वरूपाची असावी. लोकशाही दिनाकरिता अर्जदाराने अर्ज विहीत नमुन्यात १५ दिवस आधी २ प्रतीत देणे आवश्यक राहील. लोकशाही दिनामध्ये न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व/अपिल्स, सेवाविषयक, आस्थापना विषयक बाबी, विहीत नमुन्यात नसणारे व त्यासोबत आवश्यक त्या कादपत्रांच्या प्रती न जोडलेले अर्ज, अंतिम उत्तर दिलेले आहे/देण्यात येणार आहे अशा प्रकरणी पुन्हा त्याच विषयासंदर्भात केलेले अर्ज, तक्रार/निवेदन वैयक्तिक स्वरूपाची नसेल या बाबींशी संबंधित अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.सदरील लोकशाही दिनाचा तालुक्यातील नागरीक, महिला व शेतकरी बांधवांच्या अडीअडचणी जाणून घेऊन त्यांचे प्रश्न मार्गी लावण्यात येणार आहे.



# तंटामुक्त समित्या केवळ कागदावरच


**विहामांडवा । प्रतिनिधी**

गावातील वाद गावातच मिटावेत आणि गाव शांततेकडून समृद्धीकडे जाण्यासाठी सन २००७ मध्ये राज्य शासनाने महात्मा गांधी तंटामुक्त गाव अभियान सुरू करून गावागावांत समित्या स्थापन केल्या होत्या. परंतु, या समित्यांकडून आता प्रत्यक्षात अंमलबजावणी होताना दिसत नाही. गावातील तंटे, वाद गावातच मिटावेत, तर पोलिस आणि न्यायालयात दाखल होणारे खटले कमी करून वेळ आणि पैसा वाचविण्याच्या उद्देशाने शासनाने महात्मा गांधी तंटामुक्त समित्या स्थापन केल्या होत्या. गावातील तंटे, वाद पोलिस ठाण्यात पोहोचण्यापूर्वीच समित्यांकडे जावून उभयतांना मान्य असा तोडगा काढून वाद तेथेच मिटविले जायचे. शासनाकडून महात्मा गांधी तंटामुक्त योजना अंमलात आणली होती. अंमलबजावणी करणाऱ्या गावांना पुरस्कारही दिले जायचे. परंतु, हल्ली या तंटामुक समित्या गावातूनच बेपत्ता झाल्याचे चित्र आहेत.

# परभणी येथील घटनेच्या निषेधार्थ रांजणी बंदला प्रतिसाद

**जालना । असलम कुरेशी**

परभणी शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेकर यांच्या पुतळ्यासमोरील ठेवण्यात आलेल्या भारतीय संविधानाच्या प्रतीची विटंबना करणाऱ्या आरोपीस कडक शासन करण्याच्या मागणीसाठी शुक्रवारी आंबेडकरी समाज बांधवांच्या वतीने रांजणी बंदची हाक देण्यात आली होती. या बंदला व्यापारी व नागरिकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.परभणी शहरातील भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेकर यांच्या पुतळ्या समोरील ठेवण्यात आलेल्या संविधानाच्या प्रतीची तोडफोड करणाऱ्या जातीवादी व मनुवादी इसमास कडक शासन करून त्याचावर देशद्रोहीचा गुन्हा दाखल करावा. सदरील व्यक्तीच्या पाठीमागे कोणाचा हात आहे याची सखोल चौकशी करावी. या घटनेचा घनसावंगी तालुक्याच्या वतीने व रांजणी शहराच्या वतीने तीव्र निषेध करण्यासाठी व घटनेच्या निषेधार्थ शुक्रवारी रांजणी शहरासह आठवडी बाजार देखील सकाळी ८ ते दुपारी २ वाजेपर्यंत बंद ठेवण्याचे आवाहन करण्यात आले होते. या बंदला व्यापारी व नागरिकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. या बंदमध्ये रमण जाधव, कैलास जाधव, सिध्दार्थ सराटे, अरविंद जाधव यांच्यासह समाजबांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले. याप्रसंगी पोलिस निरिक्षक केतन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरिक्षक किरण पवार व बीट जमादार वैभव खोकले यांनी बंदोबस्त ठेवला होता.



# मयूर सुतार यांच्या पाठपुराव्यामुळे उरण पनवेल मार्गावर गतिरोधक

## गतिरोधक बसवल्याने होणार अपघाताचे प्रमाण कमी ;प्रवाशी,नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण

**उरण । विठ्ठल ममताबादे**

उरण तालुक्यात अनेक ठिकाणी गतिरोधक (स्पीड ब्रेकर) नसल्याने अनेक अपघात झालेले आहेत.या अपघातात अनेक जण गंभीर जखमी झाले तर काही जणांचे मृत्यू देखील झाले आहेत. गतिरोधक नसल्याने अनेक अपघात वाढत चालले आहेत. आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके हायस्कुल मुळेखंड येथे शाळेत येताना जाताना विद्यार्थ्यांच्या जीवालाही रस्ता क्रॉस करताना धोका निर्माण झाला होता. वाहने वेगात जात असल्याने लहान मुलांना व पालकांना जीव मुठीत घेउन प्रवास करावा लागत होता.ही प्रमुख समस्या लक्षात घेऊन प्रवाशांचे , नागरिकांचे अपघात होऊ नयेत,अपघात होऊन कोणाचे मृत्यू होऊ नयेत या दृष्टिकोनातून प्रवाशी वर्गांचा प्रवास सुखकर, आनंददायी व्हावा या हेतूने उरण मधील सामाजिक कार्यकर्ते मयूर सुतार यांनी उरण पनवेल मुख्य मार्गावर आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके हायस्कुल मुळेखंड येथे स्पीड ब्रेकर (गतिरोधक ) बसविण्यात यावे अशी मागणी सिडको व सार्वजनिक बांधकाम विभागाकडे केली होती. त्यासाठी त्यांनी सातत्याने पत्रव्यवहार करून पाठपुरावाही केला होता. आता या पाठपुराव्याला यश आले असून मयूर सुतार यांच्या मागणीची दखल घेण्यात आली असून आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके हायस्कुल समोर, मुळेखंड येथे गतिरोधक बसविण्यात आले आहेत. गतिरोधक बसविल्याने विविध वाहने सावकाश व शिस्त बद्ध पद्धतीने येत जात आहेत.गतिरोधक बसविल्याने आता नागरिकांचा प्रवास सुखकर, आनंददायी बनला आहे. गतिरोधक मुळे आता अपघातांचे प्रमाण कमी होण्यास मदत होणार आहे.शाळेतील लहान मुलांना आणि त्यांच्या पालकांना आता शाळेत येणे जाणे सोप्पे, सुलभ झाले आहे.त्यामुळे उरण मधील नागरिकांनी, जनतेने, शाळेतील विद्यार्थी, पालकांनी, शिक्षकांनी सामाजिक कार्यकर्ते मयूर सुतार यांच्या कार्याचे कौतुक करत त्यांचे आभार मानले आहेत.



# राहुल मुंडे प्रतिष्ठानच्या वतीने दत्त जयंती सामाजिक उपक्रम राबवून साजरी

**केज । प्रतिनिधी**

केज शहरातील शिक्षक कॉलनी भागातील कर्तबगार युवक राहुल प्रकाश मुंडे यांचे काही दिवसांपूर्वी दुःखद अपघाती निधन झाले आहे.राहुल मुंडे हा कर्तबगार युवा तरूण होता.त्याच्या अकाली जाण्याने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. राहुल मुंडे चा मोठा मित्र परिवार आहे.या सर्व राहुल च्या जिवलग मित्रांनी राहुल मुंडे प्रतिष्ठान ची स्थापना केली आहे. राहुल प्रतिष्ठानच्या वतीने विविध सामाजिक उपक्रम राबविण्याचा मानस या तरुण युवकांनी राहुल प्रतिष्ठानची स्थापना करताना व्यक्त केला होता.याकामी त्यांना एम.डी घुले सर, सुधाकर ढाकणे सर, अशोक भैया तांदळे, गायकवाड सर, मुळे सर, सुर्यवंशी दादा सर, राजसाहेब ढाकणे, गोटू पाळवदे, वैभव केंद्रे, संदीप भुतडा, अशोक घुले, डॉ विजयकुमार धस, अशोक आंधळे , गोविंद काळे,व इतर अनेक मान्यवरांनी समर्थ साथ दिली आहे. याचाच एक भाग म्हणून आज दत्त जयंती निमित्ताने शिक्षक कॉलनी भागातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत गरजवंत विद्यार्थी व विद्यार्थिनींना वह्या व पुस्तकाचे वाटप करण्यात आले. सर्व प्रथम दत्त जयंती निमित्ताने पुजन करून व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून वह्या व पुस्तकाचे वाटप कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून जाधवर मॅडम ,मुंडे मॅडम, वाघमारे मॅडम व गायकवाड सर उपस्थित होते.राहुल मुंडे प्रतिष्ठानचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी किरण वाघमारे, अशोक लांडगे ,समर्थ पारखे, ओम केदार ,सुनील शिंदे ,योगेश गायकवाड , ओम काळे,अजय मैंद व रुद्र तांदळे यांनी परिश्रम घेतले.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077